Vol 3 Issue 3 Sept 2013

Impact Factor : 1.2018 (GISI)

ISSN No :2231-5063

## Monthly Multidisciplinary Research Journal

# GoldenResearch Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume-3, Issue-3, Sept-2013
ISSN 2231-5063

Available online at www.aygrt.isrj.net

# शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या विकासात कुलगुरू बॅ.पी.जी.पाटील यांचे योगदान

**जाधव एस.एच. , कदम व्ही.एल.**

एम.ए.,एम.फिल.,नेट. सेट.,जेआरएफ.
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,पंढरपूर.

***सारांश :***महाराष्ट्रात विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ज्या अनेक सामाजिक व शैक्षणिक चळवळी उभ्या राहिल्या. त्यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सुरू केलेली शैक्षणिक चळवळ महत्वाची आहे. त्यांनी सूरू केलेले शिक्षण प्रसाराचे काम पुढील काळात महाराष्ट्राभर विस्तारीत गेले. कर्मवीरांच्या कार्यशाळेत तयार झालेल्या त्यांच्या निष्ठावान रयतसेवकांचा फार मोठा हातभार आहे.अशा रयत सेवकांमध्ये बॅ.पी.जी.पाटलांचे नाव आवर्जून घेतले पाहिजे.

### *प्रस्तवाना :*

बॅ.पी.जी.पाटील यांचा जन्म 3 जूलै 1921 रोजी सांगली जिल्हयातील कवलापूर येथे एका शेतकरी कुटूंबात झाला. बॅ.पी.जी.पाटील यांचे प्राथमिक शिक्षण कवलापूर,माध्यमिक शिक्षण सातारा व महाविद्यालयीन शिक्षण सांगली येथे झाले. पुढील शिक्षणासाठी कर्मवीरांनी त्यांना परदेशातही पाठविले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर इतर ठिकाणी नोकरीच्या संधी असतानासुध्दा बॅ.पी.जी.पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेतच नोकरी स्वीकारली. त्यांचा मनाचा मोठेपणा व जबाबदारीने काम करण्याच्या वृत्तीमुळे ते रयत शिक्षण संस्थेचे मानद सचिव झाले. पुढे बॅ.पी.जी. पाटील यांना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू होण्याची संधी मिळाली[1]

महाराष्ट्राच्या इतिहासात विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात रयत शिक्षण संस्थेने महाराश्ट्राला तीन कुलगुरू दिले. त्यामध्ये बॅ.पी.जी.पाटील यांचे कार्य महत्वपूर्ण आहे. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेत यशवंतराव चव्हाण,बाळासाहेब देसाई,अप्पासाहेब पवार यांची भूमिका महत्वपूर्ण होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने 18 नोव्हेंबर 1962 रोजी भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांच्या हस्ते या विद्यापीठाचे उदघाटन झाले. विद्यापीठाच्या स्थापनेवेळी या विद्यापीठात 34 कॉलेज व 14 हजार विद्यार्थीसंख्या होती. 5 पदव्यूत्तर विभाग होते.[2]विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ.अप्पासाहेब पवार यांनी 1962 ते 1974 असे एकूण बारा वर्षे  काम पाहिले.[3]

### *बॅ. पी. जी.पाटील यांची कुलगुरू म्हणून नियूक्ती –*

डॉ.अप्पासाहेब पवार यांनी प्रदिर्घकाळ शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरूपद भूशविले. त्यानंतर त्यांची प्रकृती साथ देइनाशी झाली. त्यावेळी त्यांच्या काळात विद्यापीठाची झालेली भरभराट पाहून त्यांच्या तोलामोलाचा व विद्यापीठाचा विकास तेवढयाच जिद्दीने करणारा नवा कुलगुरू असावा असे सर्वांना वाटत होते. त्यावेळी रयत शिक्षण संस्थेचे तत्कालीन सचिव बॅ.पी.जी.पाटील यांचे नाव पुढे आले व 14 जानेवारी 1975 रोजी शिवाजी विद्यापीठाचे दुसरे कुलगुरू म्हणून त्यांचे नाव जाहिर झाले. 20 जानेवारी 1975 रोजी बॅ.पी.जी.पाटील यांची शिवाजी विद्यापीठाचे दुसरे कुलगुरू म्हणून झालेली निवड सर्वांना सार्थ वाटली.[4] बॅ.पी.जी.पाटील यांच्या निवडीबद्दल अप्पासाहेब पवार  यावेळी म्हणाले,'विद्यापीठ स्थापनेत व विकासात बॅ. पी.जी.पाटील यांचा हात होता,तेच आता कुलगुरू झाले आहेत.[5] तर कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कुलसचिवा डॉ.उषा इथापे म्हणाल्या,"आजवर हया विद्यापीठाची प्रगती इंचाइंचाने झाली आहे. आता ती फुट आणि यार्डच्या मापातच मोजावी लागेल."[6]

बॅ.पी.जी.पाटील यांनी कुलगुरूपदाची सुत्रे हाती घेतली. त्यानंतर ते म्हणाले की,'छ. शिवाजी महाराजांच्या नावाने स्थापन झालेल्या या विद्यापीठाची सुत्रे हाती घेताना कोणतीही जातीय,प्रांतीक,भौगोलिक किंवा अन्य संकुचित भावना माझया मनामध्ये नाही. तर ज्ञानाच्या अमर्याद पसरलेल्या क्षितिजाशी स्पर्धा करणारी ज्ञानोपासना येथे घडावी.जगातील ज्या विद्यापीठांना भेट देण्याची संधी मला मिळाली.त्या विद्यापीठांची उंची गाठण्याचे काम आपण करू या.[7] 'बॅ.पी.जी. पाटील यांनी 1964 मध्ये अमेरिकेचा दौरा केला होता. त्यावेळी त्यांनी तेथील विद्यापीठे व शैक्षणिक दर्जा पाहिला होता. इंग्लंड व अमेरिकेतील विद्यापीठाप्रमाणे आपले शिवाजी विद्यापीठही ज्ञानाचे समृध्द केंद्र बनावे असे विचार त्यांनी त्यावेळी व्यक्त केले. त्याचप्रमाणे मावळते कुलगुरू अप्पासाहेब पवार यांच्याबदलही गौरवोदगार काढले. बॅ.पी.जी.पाटील यांना महाराष्ट्रातील समाजसुधारकांच्या परंपरेचा मोठा अभिमान होता. महात्मा फुले,शाहू महाराज यांच्या परंपरेतील शिक्षण कार्य करणारे भाऊराव पाटील यांसारख्या समाजसुधारकांनी खेडयापाडयातून व गोरगरिबांसाठी शिक्षण प्रसाराचे कार्य केले.म्हणूनच एका सामान्य शेतकऱ्याचा मुलगा कुलगुरू झाला. हे फार मोठे परिवर्तन होते.ते एक प्रकारे समाजसुधारकांच्या चळवळीला कालांतराने आलेले फळ होते. बॅ.पी.जी.पाटील विद्यापीठाचे कार्यकरत असतानाही ते या सामाजिक प्रवाहापासून दूर गेले नाहीत.

### *शिवाजी विद्यापीठातील कारकिर्द –*

विद्यार्थ्यांची वाढती संख्या व शिक्षण क्षेत्रात येणारे नवनवीन कोर्सेस यांचे भान ठेवून,आधुनिक शिक्षण व तंत्रज्ञान यावर आधारीत, बॅ.पी.जी.पाटील यांनी शैक्षणिक विकास घडवून आणला. पहिल्या वर्शात मुलींची संख्या वाढल्यामुळे जागा अपूरी पडू लागली.म्हणून वसतिगृहासाठी वाढीव इमारत बांधली.'कमवा व शिका'मधील विद्यार्थी विद्यापीठ कॅटीन चालवत होते.त्या कॅटीनसाठी पहिला मजला बांधला.खेळांच्या मैदानांची दुरूस्ती करून नवीन काही मैदानांच्या निर्मितस सुरवात केली.प्रशासकीय कामकाजात त्यांनी विधिसभेच्या(सिनेटच्या) तीन बैठका घेतल्या. वि.स. खांडेकर यांना डॉक्टर ऑफ लेटर्स ही पदवी द्यावी असे कार्यकारी मंडळाने सुचविले,तसेच विद्यापीठाशी संलग्नीत 57 महाविद्यालयांचे संलग्निकरण आहे,त्या स्थितीत चालू राहण्यासाठी राज्यसरकारकडे शिफारस करून परवानगी मिळविली होती.वि.स. खांडेकर यांना डॉक्टर ऑफ लेटर्स ही पदवी देण्यासाठी विशेश पदवीदान समारंभ घेण्यास मान्यता दिली.या सन 1975–76 मध्ये कार्यकारी मंडळाच्या बैठकांमध्ये कर्मचारी,प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या हिताच्या दृश्टीने अनेक निर्णय घेतले.[8]

अभ्यासक्रम मंडळाच्या बैठकांमध्ये औशध निर्माणशास्त्र विभागांतर्गत शारीरीक शिक्षण,कुटूंब नियोजन,वैद्यकीय क्ष–किरण निदान यासारखे पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात आले.[9] विद्यार्थी मंडळ हा विद्यापीठाचा महत्वाचा घटक आहे. या विद्यार्थी प्रतिनिधींसाठी कोल्हापूर युवक केंद्र व शिवाजी विद्यापीठाच्या वतीने एक उदबोधक शिबीर घेण्यात आले.महाराश्ट्रात हे अशा तऱ्हेचे हे पहिलेच शिबीर घेण्याचा मान शिवाजी विद्यापीठाने मिळविला.कुलगुरू बॅ.पी.जी.पाटील व युवा केंद्राचे कार्यकर्ते यांच्या योजकतेला हे श्रेय जाते. ही योजना जिल्हानिहाय राबविण्यात आली.1975 मधील पदवीदान समारंभ  बॅ.पी.जी.पाटील यांच्या काळातील पहिला व विद्यापीठाचा बारावा पदवीदान समारंभ 24 ऑक्टोबर 1975 रोजी आयोजित केला होता.हया समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून बॅ.पी.जी.पाटील यांनी आपले गुरू मा.गोकाक यांना बोलावले होते. गोकाक सर 'विलिंग्डन कॉलेज सांगली' येथे प्राचार्य असताना बॅ.पी.जी.पाटील हे त्यांचे विद्यार्थी होते. गोकाक सरांचा विद्यार्थी एका विद्यापीठाचा कुलगूरू झाला आहे,हया वैभवाचा सन्मान म्हणून बॅ.पी.जी.पाटील यांनी गोकाक यांना बोलावले होते. ही एक प्रकारे गुरूंच्या उपकाराची परतफेडच होती.[10]

बॅ.पी.जी.पाटील यांनी सूत्रे हातात घेतल्यानंतर लोकांच्या मनात शंका–कुशंका निर्माण झाल्या होत्या,परंतु कर्तव्यदक्ष असणाऱ्या कुलगुरूंनी आपल्या कामाची वेगळीच चमक दाखविली.त्यांच्या कार्यावर विश्वास असणारे त्यांचे गुरू गोकाक म्हणतात,'बॅ.पी.जी.पाटील यांना मी विद्यार्थी,प्राध्यापक,प्राचार्य या विविध भूमिकेत पहात आलो आहे. या विद्यापीठाच्या सर्वांगीण प्रगतीत

निश्चितच भर घातली जाईल. 'त्याप्रमाणेच कुलगुरूंनी मोठया तडफेने नवनवीन योजना हाती घेऊन कर्मचारी वर्ग,प्राध्यापक यांच्या सहायाने आपले कार्य चालू ठेवले.

कार्यकारी मंडळाच्या 1976—मध्ये बॅ.पी.जी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एकूण चौदा बैटका झाल्या. त्यामध्ये विद्यार्थी,प्राध्यापक व कर्मचारी यांच्या सोयीसाठी काही बदल केले व काही नवीन योजना राबविल्या. त्यामधील काही महत्वाचे बदल पुढीलप्रमाणे होते. विद्यापीठातील प्राध्यापक व कर्मचारी वर्गाच्या लहान मुलांच्या  शिक्षणाची सोय व्हावी म्हणून 'श्री शिवाजी बालमंदीर' नावाने मॉन्टेसरी शाळेची स्थापना करण्यात आली. सहायक शिक्षक म्हणून विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात काम करणाऱ्या शिक्षकांना बढती देण्याचा निर्णय घेण्यात आला.विद्यापीठाच्या 'ॲकेडमिक कौन्सील'ने शिफारस केलेली जैम स्जम क्तण।ण्छण्न्चंकीलमएउमउवतपंस चतप्रमे  या नावाने बी.ए. व एम.ए. ला अर्धमागधी विशयासाठी शिश्यवृत्ती सुरू करण्यात आली, तसेच मा.नामदार रत्नाप्पाण्णा कुंभार वाणिज्य पारीतोशिक बी.कॉम. व एम.कॉम.साठी सुरू केले.[11]

पुढील महाविद्यालयांना पदव्युत्तर कोर्स सुरू करण्यास मान्यता दिली होती.

अ) कला विभाग—

1) शिवाजी महाविद्यालय बार्शी : मराठी, इंग्लिश,हिंदी.

2) मुधोजी कॉलेज फलटण : मराठी, हिंदी.

ब) शास्त्र विभाग—

1) द न्युज कॉलेज,कोल्हापूर : एम.एस्सी.फिजिक्स.

क) वाणिज्य विभाग—

1)आर्टस ॲन्ड कॉमर्स कॉलेज, वाई : मार्केटींग ॲन्ड ट्रान्सपोर्ट.

2)गणपतराव अरवाडे कॉलेज ऑफ कॉमर्स, सांगली : एम. कॉम. भाग 1 आणि 2.

ड) वैद्यकशास्त्र विभाग—

1) मिरज मेडिकल कॉलेज, मिरज : पीएच. डी. बायोकेमिस्ट्री,

2)डॉ.व्ही.एम.मेडिकल कॉलेज,सोलापूर : डी.सी.एच. यामुळे विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची सोय झाली.[12]

विद्यार्थी मंडळाने मांडलेल्या प्रस्तावाला कुलगुरू व कार्यकारी मंडळाने मान्यता दिली होती. त्यानुसार सोलापूर जिल्हयातील पदवीधर विद्यार्थ्यांच्या पदव्यूत्तर शिक्षणासाठी तेथे एका कॉलेजमध्ये पदव्यूत्तर केंद्राची सोय करण्याचे ठरले. तसेच कॉनव्हेकेशन फंक्शनला दीक्षांत समारंभ असे नाव दिले व पुढे त्या जागी'पदवीदान समारंभ' असे नामकरण करण्यात आले. विद्यार्थी मंडळाचे मासिक तयार करण्यासाठी एक समिती नेमली होती. त्या समितीने मासिकासाठी येणारा खर्च,पानांची संख्या व कोणता मजकुर छापवयाचा हे ठरविण्यात आले.[13]

18 नोव्हेंबर 1976 ला विद्यापीठाचा तेरावा पदवीदान समारंभ व बॅ.पी. जी.पाटील यांच्या कारकीर्दीतील दुसरा पदवीदान समारंभ आयोजित करण्यात आला होता.या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून जवाहरलाल नेहरू विद्यापीठ,नवी दिल्लीचे कुलगुरू डॉ बी.डी.नागचौधरी यांना बोलावले होते. यावर्शी एकूण 11,098 विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली होती. विद्यापीठीय उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढू लागल्याची चिन्ह या पदवीदान समारंभावरून दिसून येते.[14]

पाचव्या पंचवार्षिक योजनेनुसार विद्यापीठ अनुदान आयोगाने विविध इमारती बांधण्यासाठी अनुदान दिले होते. त्यानुसार रसायन शास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र या विभागांच्या इमारती बांधण्यात आल्या. तसेच शिक्षक,रिडर व प्रोफेसर यांच्या राहण्याच्या व्यवस्थेसाठी ब्लॉकचे बांधकाम करून घेतले होते.[15]

'कमवा व शिका' योजनेचा उपक्रम कर्मवीर अण्णांनी सर्वप्रथम सुरू केला होता.विद्यापीठात हा उपक्रम ' अप्पासाहेब विद्यार्थी भवन' या नावाने राबविला जात होता. विद्यापीठात बॅ.पी.जी.पाटील कुलगुरू म्हणून गेल्यानंतर विद्यार्थ्यांच्यात वेगळाच उत्साह निर्माण झाला. त्याबाबत प्राचार्य आर.डी.गायकवाड, ' म्हणतात 'कुलगुरूंनी 'कमवा व शिका'योजनेतील विद्यार्थ्यांना विविध कार्यक्रम व उपक्रम यामध्ये संधी दिल्या.त्यामुळेच त्या विद्यार्थ्यांच्या मनामध्ये असणारी कमीपणाची भावना संपून गेली.'[16] या योजनेअंतर्गत पीठाची गिरणी,उपहारगृह,शेती,बागकाम इ. व्यवसायात विद्यार्थी काम करत होते.बॅ.पी.जी.पाटील स्वावलंबन हे कर्मवीर अण्णांचे तत्व विद्यापीठातील विद्यार्थ्यांना पुन्हा पुन्हा सांगत होते.

पहिल्या बैठकीत आयुर्वेद शास्त्रातील पदविका अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच वाणिज्य विभागात मटेरिअल मॅनेजमेंट,मराठी टॅक्सशन,पर्सनल सेक्रेटरीशिप असे डिप्लोमा कोर्सेस सुरू करण्यात आले.दुसऱ्या बैठकीमध्ये डिप्लोमा इन मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी हा कोर्स सुरू करण्यास मान्यता दिली होती.

कार्यकारी मंडळाच्या बैठकीमध्ये पुढील महत्वाचे निर्णय घेण्यात आले. मिरज मेडिकल कॉलेज,मिरजला ढालगाव येथे इंटरशिपसाठी केंद्र सुरू करण्यास अनुदान देण्यात आले,तसेच पंचगंगा सहकार साखर कारखाना इचलकरंजी,यांनी 5000 रू.दिले.या पैशाच्या ठेवीतून गरीब,हुशार व गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत केली जाऊ लागली.

शास्त्र विभागातून बारावी पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना बी.फार्म कोर्ससाठी प्रवेश देण्यात येऊ लागला.आयुर्वेदीक विभागाची सुरवात केली.एम.बी. बी.एस.साठी मिरज मेडिकल कॉलेजला 50 व सोलापूर येथील मेडिकल कॉलेजला 75 जागा वाढविण्यात आल्या.बी.एस्सी.(नर्सिंग) कोर्स सुरू केला,तसेच नारायणदास सर्वोत्तमदास लॉ कॉलेज,सांगली सेथे एल.एल.एम.अशी पदव्यूत्तर विभागाची सुरूवात केली.

विद्यार्थी मंडळाच्या कुलगुरूंच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारी मंडळाने निवडणूका घेतल्या. त्यामधून विधिसभेवर दोन विद्यार्थी सभासद नियुक्त केले. हयावर्शी विद्यार्थी मंडळाचे श्रमसंस्कार शिबीर तळकोकणात आयोजित करण्यात आले होते. बॅ.पी.जी.पाटील तरूणांच्या काळजाला कसे हात घालतात याचे एक उदाहरण मोहन द. तावडे देतात,'तळकोकणातील शिबीराच्या समारोपा दिवशी सायंकाळी कुलगुरू गेले होते.......तेव्हा सर म्हणाले,'मुलांनो तुमचे हात बघू?'तेव्हा मुलांना काही कळेना. मुलांनी तळवे सरांच्या समोर केले. 'हे खरे श्रम तुमच्या तळहातांना फोड आलेत!' सरांची ही शाबासकी ऐकून मुले अंतर्मुख झाली. श्रमामुळे तळहातांना आलेल्या फोडांचा सरांनी आपल्या भाशणात उल्लेख केला तेव्हा मुले श्रम विसरून समाधान पावली.[17]

बॅ.पी.जी.पाटील हे कुलगुरू असताना त्यांनी फक्त विद्यापीठाचे प्रशासन व विकासाचे काम पीहिले असे नाही,तर त्या काळात त्यांनी रयत शिक्षण संस्थेकडेही लक्ष दिलेले दिसते.त्याचप्रमाणे ते एक नामवंत वक्ते असल्याने निरनिराळया कार्यक्रमानिमित्त अवघ्या महाराष्ट्राभर त्यांनी व्याख्याने दिलेली आहेत.त्यांची व्याख्याने विनोदी परंतु प्रबोधनपर असत.

### *समन्वय साधणारे कुलगुरू :*

बॅ.पी.जी.पाटील यांचा कुलगुरूपदाचा कालखंड म्हणजे कर्मचाऱ्यांना विश्वासात घेऊन व विद्यार्थ्यांचे हित साधणारा कालखंड होता. शिवाजी विद्यापीठात उपकुलसचिव म्हणून काम करणारे डॉ.रा.अ.कडियाळ म्हणतात,'बॅ. पाटील यांच्या मानवतावादी भूमिकेमुळे कर्मचाऱ्यांत एक प्रकारचा विश्वास निर्माण झाला. आपले दुःख गाऱ्हाणे ऐकणारे कोणीतरी आहे,असा दिलासा सर्वसामान्य सेवकांना मिळाला. आर्थिक अडचणींनी गांजलेल्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या पाठीवरून हात फिरवत त्यावेळी त्यास मोठा आधर मिळे. त्या काळात कर्मचाऱ्यांना आपल्यावर कुलगुरूंचा विश्वास आहे व आपल्या मतासही मान आहे. या जाणिवेने काम करत असत. सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचे कसब बॅ.पाटील यांनी साधलेले होते.'[18]

त्यांच्या काळात अनेक संघर्शाचे प्रसंग आले,पण ते त्यांनी सामोपचाराने सोडविले. कुलगुरूपदाचा चार्ज घेतल्यानंतरच परीक्षा पुढे ढकलण्याच्या प्रश्नावर विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला तोंड देण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला,परंतु तो प्रश्न त्यांनी कुशलतेने हाताळला. तसेच 1978 साली शिवाजी विद्यापीठावर विद्यार्थ्यांचा मोर्चा आलेल्या मोर्चाने उग्र रूप धारण केले होते. तेवढयात कुलगुरूंची गाडी आली. कुलगुरू गाडीतून खाली उतरले व विद्यार्थ्यांच्या बरोबर चालू लागले. कार्यालयाकडे जाता—जाताच मुलांशी चर्चा केली. अडी—अडवणी सोडविण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे मोर्चाचे स्वरूपच बदलून गेले. जे विद्यार्थी कुलगुरूंच्या विरोधात घोशणा देत होते. ते विद्यार्थी कुलगुरूंना धन्यवाद देऊन निघून गेले.[19] काही वेळा विद्यार्थ्यांचे चुकत असल्यास कठोर भुमिका घेण्यासाठी त्यांनी मागेपुढे पाहिले नाही.

कुलगुरू या नात्याने बॅ.पी.जी.पाटील यांच्या कारकीर्दीचे मूल्यमापन करताना डॉ.रा.अ.कडियाळ म्हणतात,'बॅ.पाटलांची कुलगुरूपदाची कारकीर्द ही सनदशीर,लोकाभिमुख आणि विद्यार्थी,शिक्षक आणि कर्मचाऱ्यास सुखद अशीच झाली.या सर्व कार्यामागे त्यांची स्वार्थत्यागी वृत्ती कायम राहिली. त्यांनी कुलगुरूपदासाठी असणारे प्रवास भत्ते घेण्याचे टाळले. सव्वा तीन वर्शात त्यांनी न घेतलेल्या भत्त्यांची रक्कम सुमारे 40,000 रू. इतकी होती. विद्यापीठाची गाडी आणि ड्रायव्हर मला आहे.मग मी भत्ता कशासाठी घ्यायचा असे ते म्हणत. या मागे आम्हा सर्वांचे गुरू कर्मवीर यांची सात्विक व पवित्र भूमिका उभी असे. भत्ते न घेणारा कुलगुरू आखिल भारतात बॅ.पी.जी.पाटील हे एकटेच असावेत.[20]

अशा तऱ्हेने विद्यापीठाचे प्रशासन उत्कृष्ट चालवून पूर्वीच्या कुलगुरूंच्या तोडीने विकासकामे साधून बॅ.पाटील यांनी विद्यापीठाची प्रगती केली. विद्यार्थ्यांच्यात रमणारे,कर्मचाऱ्यांना समजावून घेणारे व विद्यापीठाचे आधुनिकीकरण करण्याच्या दृश्टीने पाऊल टाकणारे हे कुलगुरू होते. बॅ.पी.जी. पाटील यांना 15/04/1978 रोजी त्यांच्या उत्कृष्ट कारकीर्दीबद्दल शिवाजी विद्यापीठ प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी मानपत्र अर्पण केले. शासकीय मुदत संपल्यानंतर आपल्या पदावरून दिनांक 16/04/1978 रोजी ते सेवानिवृत्त झाले.[21]

***संदर्भ व तळटीपा :***

1)डॉ.माळी शिवराम (संपा)'उदयंती'लेख.नीळकंठ गुरूजी,'पांडुरंग माझा बालपणीचा सवंगडी',पृष्ठ क्र.4,5. 1982.

2)Hadbook of universities-volum II, Complied by Ameeta Gupta, Ashish Kumar, Page no.267.

3) पदवीदान पुरवणी, वर्श 1975,पृष्ठ क्र.४१.

4) बॅ.पी.जी.पाटील, विशेषांक:'रयत शिक्षण पत्रिका'–संपादकीय.

5) शिवसंदेश, वर्ष ६ वे अंक दुसरा–1975,पृष्ठ क्र,5.

6) रयत शिक्षण संस्थेची, 'रयत शिक्षण पत्रिका' 1975, पृष्ठ क्र 21.

7)Shivaji Universities, Annual Report, 1975-1976,Page No.1,2.

8) कित्ता पृष्ठ क्र.6.

9) पदवीदान पुरवणी, वर्ष 1975, पृष्ठ क्र41,42,43.

10) कित्ता पृष्ठ क्र.5,6.

11) कित्ता पृष्ठ क्र.8.

12) कित्ता पृष्ठ क्र.9.

13) कित्ता पृष्ठ क्र.2.

14) Shivaji Universities, Annual Report, 1977-1978,Page No-1.

15) मुलाखत – प्राचार्य गायकवाड आर. डी.–23 / 12 / 2006.

16) सांगाती,त्रैमासिक,1993,डॉ.मोहन द. तावडे,लेख.पृश्ठ क्र.8

17) Shivaji Universities, Annual Report, 1977-1978,Page No-2.

18) डॉ.माळी शिवराम (संपा)'उदयंती' रा.अ.कडीयाळ, लेख.'वृतस्थ जीवन', पृष्ठ क्र.279

19) सांगाती,त्रैमासिक,1993,डॉ.मोहन द. तावडे,लेख.पृष्ठ क्र.5.

20) डॉ.माळी शिवराम (संपा)'उदयंती' रा.अ.कडीयाळ, लेख.'वृतस्थ जीवन', पृष्ठ क्र.279

21)According to University Record, Shivaji University, Kolhapur

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net